लोक सहभागावर आधारीत पर्यावरण
कृती कार्यक्रम.-

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१०/प्र.क्र.९८/तां.क.३
मंत्रालय, मुबई- ४०००३२
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१०

**प्रस्तावना :**

देशातील डोंगराळ प्रदेशाच्या विकासास चालना देण्यासाठी राष्ट्रीय विकास मंडळाच्या शिफारशीनुसार १९७४-७५ या वर्षापासून महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ व गोवा या राज्यामध्ये पश्चिम घाट विकासाचा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. ज्या तालुक्यातील किमान २० टक्के क्षेत्र ६०० मीटर उंचीवर किंवा त्यापेक्षा जास्त उंचीवर आहे अशा क्षेत्राचा पश्चिम घाट क्षेत्रात समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार राज्याच्या १२ जिल्हयातील ६३ तालुक्यांमध्ये पश्चिम घाट विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत पश्चिम घाट क्षेत्रामध्ये लोक सहभागावर आधारीत पर्यावरण प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत पश्चिम घाट कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व संबंधित जिल्हयांमध्ये लोकसहभागावर आधारीत पर्यावरण कृती कार्यक्रम राबविण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.-

**उद्दिष्ट :**

पश्चिम घाट विकास क्षेत्रातील लोकसमुहाच्या पर्यावरण विषयक जाणिवा समृध्द करणे व त्यातून पश्चिम घाट क्षेत्राचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करणे.

**कार्यक्रम :**

या अंतर्गत खालील स्थानिक लोकसहभागाचे प्रकल्प / कार्यक्रम राबविण्यात येईल.

१. पश्चिम घाट क्षेत्रातील जैवविविधतेचे संवर्धन,
२. पश्चिम घाट क्षेत्रात चारा व इतर पशूखाद्य निर्मितीत वाढ करणे,
३. सामाजिक जागेचा निसर्गसंवर्धनार्थ वापर,
४. भूजल प्रभारण,
५. घनकचरा व्यवस्थापन,
६. स्थानिक पर्यावरण सुधारणा,
७. अपारंपारीक ऊर्जा स्त्रोतांचा वापर,
८. इको-व्हिलेज, पर्यावरण सेवा योजना इ. सारख्या योजना,

९. पर्यावरणीय आधारीत जीवनशैली असलेल्या समाजाकरीता स्थायी उपाययोजना,
१०. पर्यावरण पूर्व पदावर आणणे (Eco-restoration),
११. पर्यावरण संसाधनांचा शाश्वत विकास व वापर,
१२. स्थानिक जनसमुहाच्या पर्यावरणाशी संबंधित गरजा व आशा आकांशांशी निगडीत कार्यक्रम.

**कार्यपध्दती :**

१) पर्यावरण संवर्धनार्थ स्थानिक गरजा लक्षात घेऊन, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत शैक्षणिक संस्था/सार्वजनिक क्षेत्र/अशासकीय संस्था/सहकारी संस्था/ शासकीय यंत्रणा/व्यक्ती यांच्या मार्फत लोक सहभागातून नाविण्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येईल.

२) सदर प्रस्ताव मागविण्यासाठी राज्यातील प्रमुख मराठी व इंग्रजी वर्तमानपत्राद्वारे जाहिरात देण्यात येईल. तसेच याबाबत जिल्हाधिकारी कार्यालये व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंचायत समितीच्या फलकावर माहिती प्रदर्शित करण्यात येईल.

३) योजनेचे संक्षिप्त स्वरुप, प्रकल्पाचे विषय, योजनेचे मार्गदर्शक तत्वे, प्रस्तावाचे प्रारुप नमुने इत्यादी विभागाच्या संगणक स्थळावर व जिल्हाधिकारी कार्यालये व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंचायत समिती कार्यालयांत उपलब्ध करण्यात येतील.

४) उपरोक्त पध्दतीने विभागाकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांपैकी अंतिम निवड पर्यावरण विभाग व नियोजन विभाग संयुक्तपणे करतील.

५) सुकाणू समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :-

| | | |
|---|---|---|
| सचिव (पर्यावरण) | .. | अध्यक्ष |
| सह/उप सचिव (वित्त) | .. | सदस्य |
| सह/उप सचिव (नियोजन) | .. | सदस्य |
| सह/उप सचिव (अर्थसंकल्प), पर्यावरण | .. | सदस्य |
| विशेष निमंत्रित सदस्य (दोन) | .. | सदस्य |
| शास्त्रज्ञ-१, पर्यावरण | .. | सदस्य सचिव |

६) सदर समिती प्राप्त प्रस्तावांपैकी मूल्यांकन पत्रकानुसार प्राथम्यक्रमाने राबवावयाच्या प्रस्तावांची यादी सादर करेल.

७) या प्राथमिक यादीतील प्रस्तावांचे सुकाणू समिती समोर सादरीकरण करण्यात येईल.

८) सादरीकरणानंतर निवड झालेले प्रस्ताव व प्रस्तावाशी संबंधित व्यक्ती/संस्था/शासन यंत्रणा यानुसार निधी वितरणाच्या बाबीं ठरविण्यात येतील.

निवडण्यात आलेल्या योजनांचे दर ३ महिन्यांनी सुकाणू समितीमार्फत मुल्यमापन करण्यात येईल. पश्चिम घाट विकास योजनेशी संबंधीत मार्गदर्श सुचनांना अनसरुन सुकाणू समितीने दिलेल्या सुचनांचे पालन करणे आवश्यक असून, तसे न झाल्यास सदर प्रकल्प बंद करण्यात येईल.

९) निवड झालेल्या प्रकल्प राबविणाऱ्यांनी दरमहा खर्चाचे आर्थिक व भौतिक उद्दीष्ट प्राप्ती वेळोवेळी नमूद केलेल्या विवरण पत्रात देणे आवश्यक असेल. त्याचप्रमाणे त्यांच्या खर्चाची आणि प्रत्यक्ष कामाची पहाणी केव्हांही करण्यात येईल आणि त्यांच्या वित्तीय बाबी महालेखापाल यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती/यंत्रणांमार्फत तपासण्यास खुले असतील.

१०) प्रकल्प जेथे सुरु असेल तेथे योजनेच्या स्वरुपानुसार शक्य असल्यास, योजनेचा फलक असावा आणि त्यात इतर बाबीं व्यतिरिक्त खर्च तसेच भौतिक उद्दीष्ट समाविष्ट असावीत.

**<u>वित्तीय बाब :</u>**

उपरोक्त कार्यक्रमासाठी नियोजन विभाग, पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त एकूण निधीतून दरवर्षी आवश्यक तो निधी वितरीत करेल. सदर निधी वितरण हे सुकाणू समितीने मान्य केलेल्या प्रस्तावांनुसार प्रस्तावांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेसह वेळोवेळी वितरीत करण्यात येईल.

यावरील खर्च हा, "२५५१-डोंगराळ क्षेत्र-०१-पश्चिम घाट" या मुख्य लेखाशिर्षाखालील संबंधित उपशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाचे सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.७६०७/नि.वि. दिनांक १२.१०.२०१० अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्र.२०१०१०२६१४२५०७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

**(वल्सा आर. नायर सिंह)**
**सचिव (पर्यावरण), महाराष्ट्र शासन**

प्रत

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५) मुख्य सचिव
६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७) सर्व विभागीय आयुक्त (पश्चिम घाट क्षेत्र)
८) सर्व जिल्हाधिकारी (पश्चिम घाट क्षेत्र)
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा) महा.१, महा-२, मुंबई/नागपूर
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१२) उप सचिव (वित्त विभाग/व्यय-१६) समिती सदस्य
१३) उप सचिव (नियोजन विभाक/कार्या-१४८३), समिती सदस्य
१४) वित्त विभाग (अर्थ-१९/व्यय-१६) मंत्रालय, मुंबई,
१५) नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई,
१६) सर्व उप सचिव, पर्यावरण विभाग,
१७) निवड नस्ती/तां.क.३